**<u>पुढील सरतपासणी शपथेवर द्वारा श्री व्ही. एस. एंचिलवार, गैरअर्जदाराचे वकिल.</u>**

०६. मी शपथेवर कथन करतो की, प्रतिज्ञापत्रातील मजकूर मी वाचला असुन त्यातील मजकूर माझ्या सांगण्याप्रमाणे आहे. प्रतिज्ञापत्रावर माझी स्वाक्षरी असुन त्यातील मजकूर सत्य आहे.

**<u>उलटतपासणी द्वारा श्रीमती एस. एन. दांडेकर, अर्जरदाराचे वकिल.</u>**

०७. मी दहेगांव माईन्स येथे देखरेख करतो. माझे पद हे सुपरवाईझर म्हणुन आहे. मी सन १९७० पासून तेथे कामाला आहे. मला माहीत नाही की, तक्रारदाराने कामगार न्यायालयात तक्रार दाखल केली होती. हे म्हणणे खरे नाही की, मला कामगार न्यायालयाचे आदेशाची माहीती झाली होती. कामगार न्यायालयाचे आदेशाला आम्ही आव्हान दिलेले नाही. मला माहीत नाही की, सहा. कामगार आयुक्त यांचेकडून तक्रारदाराने रिक्वहरी प्रमाणपत्र प्राप्त केले होते. हे म्हणणे खरे आहे की, कामगार आयुक्तांकडे ते प्रकरण प्रलंबित आहे. हे म्हणणे खरे नाही की, सध्याचे प्रकरण व कामगार आयुक्तांकडे प्रलंबित असलेले प्रकरण वेगवेगळे आहे. हे म्हणणे खरे नाही की, कामगार आयुक्ताकडे जे प्रकरण आहे ते वसुलीबाबत आहे व सध्याचे प्रकरण हे अनुचित कामगार प्रथेसंबंधी आहे. हे म्हणणे खरे नाही की, कामगार न्यायालयाचे आदेशाप्रमाणे पैसे दिले नसल्यामुळे सदर प्रकरण दाखल केले आहे.

०८. हे म्हणणे खरे नाही की, तहसिलदार हे पैस्यांची वसुली करण्याकरिता आले होते, परंतु आम्ही त्यांना सहकार्य केलेले नाही म्हणुन प्रकरण दाखल करण्यास

उशिर झालेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, मुंबई येथे या कंपनीची शाखा आहे. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदार हे अशिक्षित असल्यामुळे व त्यांना कायद्याचे ज्ञान नसल्यामुळे ते न्यायालयाचे आदेशाचे अवमान केल्याबाबत प्रकरण दाखल करु शकले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे प्रतिज्ञापत्र दाखल केले असुन खोटी साक्ष देत आहे.

उलटतपासणी संपली.

फेरतपासणी - निरंक.

श्वणोत्तर स्विकृत,

स्वा/-

भंडारा.
दिनांक :- ०६/०३/२०२६.

(किशोर म. जयस्वाल)
सदस्य,
औद्योगिक न्यायालय, भंडारा.